**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकोला पोलीस ठाणे ★ मुंबई ★

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बृहनमुंबई शहर **P.S.(ठाणे):** वाकोला

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0177 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 21/02/2026 16:36

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | प्रतिलिपी अधिकार अधिनियम, १९५७ (सुधारीत अधिनियम १९८४ आणि १९९४) | 63 |
| 2 | प्रतिलिपी अधिकार अधिनियम, १९५७ (सुधारीत अधिनियम १९८४ आणि १९९४) | 69 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिंनाक पासून):** 22/08/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 22/08/2025

**Time From (वेळेपासून):** 14:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 30/08/2025 **Time (वेळ):** 00:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 030

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 21/02/2026 16:08 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बॉलरूम नं 3,ग्रॅण्ड हयात हॉटेल ,सांताक्रुज पूर्व, मुंबई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. संदिप अशोक गायकवाड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):** 705153525441

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | के/09 रूम नंबर 716,प्रभात सोसायटी,एम एम आर डी ए वसाहत, कांजुरमार्ग पश्चिम मुंबई,वाकोला,बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | के/09 रूम नंबर 716,प्रभात सोसायटी,एम एम आर डी ए वसाहत, कांजुरमार्ग पश्चिम मुंबई,वाकोला,बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9619915998

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | टीएम व्हेन्चर प्रा. लि चे डायरेक्टर श्री आलाप जयंतीलाल गोशेर | | | 1. पत्ता माहिती नाही ,वाकोला, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | नॉमिनी डायरेक्टर श्री देवराज सन्याल | | | 1. पत्ता माहिती नाही ,वाकोला, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | डायरेक्टर श्री सौरभ अभि | | | 1. पत्ता माहिती नाही ,वाकोला, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | अँडिशनल डायरेक्टर श्री सनुजीत भुजबळ | | | 1. पत्ता माहिती नाही ,वाकोला, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 5 | क्रिएट अँड कोलंब प्रा. लि. चे बिजनेस हेड श्रीमती चांदणी सोनी | | | 1. पत्ता माहिती नाही ,वाकोला, बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |
| 6 | टीएम व्हेन्चर प्रा. लि. कंपनी | | | 1. बंगलो नं 182,आराम नगर 2, जे पी रोड ,अंधेरी पश्चिम मुंबई ,वाकोला,बृहनमुंबई शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

जवाब दिंनाक 21/02/2026

श्री. संदिप अशोक गायकवाड, वय 37 वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा.ठी. के/09 रूम नंबर 716, प्रभात सोसायटी, एम.एम.आर.डी.ए. वसाहत, कांजुरमार्ग (प), मुंबई 400078. मो. क्र. 9619915998 आधार क्र. 705153525441, ई-मेल आयडी -sandeep.g@novex.in

मी वरील प्रमाणे असून वर नमूद ठिकाणी माझ्या कुटूंबासमवेत राहावयास आहे. मी नोवेक्स कम्युनिकेशन प्रा. लि. या कंपनीमध्ये फिल्ड ऑफिसर तथा लिगल असिस्टंट तथा अँटी पायरसी या पदावर मागील 15 वर्षापासून काम करीत आहे. नमूद कंपनीचे कायलियीन पत्ता:- ऑफिस बी/301, रेमी बीजकोर्ट, आर विंग, प्लॉट नंबर.9, शाह इडस्ट्रीयल ईस्टेट, विरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई 400053 असा आहे. कंपनी कायदा 1956 मधील तरतुदी नुसार नोवेक्स कंपनी नोंदणीकृत करण्यात आली आहे.

आमच्या कंपनीकडे सारेगमा इंडीया लि., टीप्स इंडस्ट्रीज लीमीटेड (टीप्स), यशराज फिल्म्स प्रा.लि. (यशराज), झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस ली. (झी), शेमारू इंन्टरटेंन्मेंन्ट लि.SPI म्युजिक प्रायव्हेट लिमिटेड (थिंक म्युजिक), रेड रिबन एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड (रेड रिबन), साई प्रोडक्शन (साई), डी रेकॉर्ड्स इंटरनॅशनल प्रा. लि. (डीरेकॉर्ड्स), कलमकार म्युजिक प्रा.लि. व 'डायमेन्शन कम्युनिकेशन प्रा.लि' (व्हेलव्हेट वाईब्ज) या कंपनीने ज्या चित्रपटामधील गीतांची व अल्बमची निर्मिती केलेली आहे. त्या गीतांची गाणे वाजविण्याचे स्वामित्व हक्क नमूद कंपनीने आमच्या कंपनीकडे दिलेले आहेत. वरील नमूद सर्व कंपनींनी आजपर्यंत विविध गाजलेल्या चित्रपटाची व गीतांची निर्मिती केलेली आहे. वरील नमूद सर्व कंपनींनी नोवेक्स कम्युनिकेशन्स प्रा.लि. कंपनीची त्याच्याकडे अधिकार असलेल्या चित्रपटातील गीतांचे ऑन ग्राऊंड पब्लिक परफॉर्मेस लायसन्स देण्याकरीता अधिकृत नेमणुक केली आहे व त्याप्रमाणे त्यांनी आमच्या कंपनीला अधिकारपत्र दिलेले आहेत.

आमची कंपनी विविध व्यावसायिक आस्थापना जसे ओपन लॉन्स, हॉटेल्स, रेस्टॉरंटस, डिस्कोथेक्स, ऑर्केस्ट्रा बार, कॉलेज कॅम्पस, लाईव्ह ईव्हेंटस, डि.जे., सिनेमा हॉल, शोज, लग्नाचे हॉल, ऑफीसेस, एॅम्युजमेंट पार्क, क्लब, पब्स, प्रायव्हेट शोज, फॅशन शोज, प्रदर्शन आणि ईतर सार्वजनिक ठिकाणी वरील नमुद कंपनीची गीते कोणत्याही तऱ्हेने वाजविण्यासाठी ऑन ग्राऊंड पब्लिक परफॉर्मस लायसन्स देते. कंपनीकडे अधिकार असलेले वर नमूद कंपनीची गीते वर नमुद ठिकाणी स्वामित्व हक्क असलेल्या कंपनीच्या परवानगीशिवाय वाजविल्यास तो कॉपीराईट कायदा1957 चे कलम 63,69अन्वये गुन्हा आहे. सदर कलम हे दखलपात्र व अजामिनपात्र आहे. वरील नमुद ठिकाणी नमूद कंपनीच्या चित्रपटाची गीते स्वामित्व हक्क असलेल्या कंपनीच्या परवानगीशिवाय वाजविले जातात की नाही याची पडताळणी करणे, अशा ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन जे स्वामित्व हक्क असलेल्या कंपनीच्या परवानगीशिवाय नमूद कंपनीच्या चित्रपटाची गीते वाजवितात त्याचे व्हिडीओ चित्रिकरण करुन त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी नोवेक्स कंपनीतर्फे माझी नियुक्ती केलेली आहे व त्याप्रमाणे माझ्या नावाने नोवेक्स कम्युनिकेशन्स प्रा.लि. कंपनीने अधिकारपत्र दिले आहे.

आमच्या कंपनीने विविध वर्तमानपत्रात तसेच ट्रेड मॅगजिन्स मध्ये पब्लिक नोटीस प्रकाशित केली आहे व त्यामध्ये वरील नमुद सर्व सार्वजनिक ठिकाण व व्यवसायिक आस्थापना यांना सुचित करण्यात आले आहे की वरील कंपनींची गीते त्यांच्या व्यवसायिक आस्थापनेमध्ये चालु कार्यक्रमांच्या वेळी वाजविण्यासाठी स्वामित्व हक्क असलेल्या कंपनीकडून ऑन ग्राउंण्ड पब्लिक परफॉर्मस लायसन्स घेणे जरुरी आहे. सदर कंपनीच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारे त्या कंपनीचे गीते वाजविल्यास त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची समज देण्यात आली होती.

दिंनाक 20/08/2025 व 29/08/2025 रोजी आमच्या कंपनीच्या वतीने 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.' व त्यांची उप कंपनी 'क्रिएट अँड को-लॅब प्रा. लि.' यांच्या विरूध्द वाकोला पोलीस ठाणे येथे केलेल्या तक्रार अर्जाच्या चौकशीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक, प्रविण खराडे यांनी बोलाविल्यावरून समक्ष हजर राहून पुढील प्रमाणे माझा जबाब दिला आहे.

आमच्या कंपनीला विविध सोशल माध्यमाव्दारे माहिती मिळाली की, ग्रॅण्ड हयात हॉटेल, सांताक्रूज (पूर्व), मुंबई या ठिकाणी दिंनाक 20/08/2025 ते 22/08/2025 रोजीचे दरम्यान 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.,' या कंपनीची उप कपंनी 'क्रिएट अँड को-लॅब प्रा. लि.' यांनी 'ऑल अबाउट म्युझिक 2025' हा कार्यक्रम आयोजित केलेला असून त्यामध्ये बॉलीवुड मधील संगीत क्षेत्रातील मान्यवर लोक उपस्थित राहून त्यांनी तयार केलेल्या म्युझिक बाबत संगीत क्षेत्रात नव्याने पदार्पण करणाऱ्या लोकांना माहिती देण्याचे प्रामुख्याने प्रयोजन होते. नमूद कार्यक्रम हा संगीतावर आधारीत असल्याने नमूद कार्यक्रमाच्या वेळी आमच्या कंपनीकडे स्वामित्व असलेल्या कंपनीची गाणी वाजविली जाण्याची शक्यता होती. त्यामुळे आम्ही दिंनाक 19/08/2025 रोजी 08.27 वा. 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.' या कंपनीच्या सिस्टर कंपनी क्रिएट अँड को-लॅब प्रा. लि. च्या बिझनेस हेड श्रीमती चांदणी सोनी यांची chandni.soni@createandcollab.in या ईमेल आयडीवर मेल करून त्यांना आमच्या कंपनीचे ऑन ग्राऊंड पब्लिक परफॉर्मस लायसन्स हा परवाना घेण्याबाबत कळविले होते. नमूदबाबत 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.,' च्या बिझनेस हेड श्रीमती चांदणी सोनी यांना आमच्या कंपनीचे मुंबई सेल्स हेड श्री. जॉईल नॅश यांनी फोनव्दारे अनेक वेळा अवगत केलेले होते. नमूद ईमेलच्या अनुशंगाने श्रीमती चांदणी सोनी दिंनाक 20/08/2025 रोजी 19.01 वा. आम्हाला तसेच हॉटेल ग्रॅण्ड हयात यांना मेल करून त्यांच्या कार्यक्रमामध्ये आमच्या नोव्हेक्स कंपनीकडे स्वामित्व हक्क असलेल्या संगीत त्यांच्या कंपनीकडून गाणे वाजविले जाणार नाही याबाबत डीक्लेरेशन दिले. सदर बाबत दि. 20/08/2025 रोजी वाकोला पोलीस ठाणेस प्रि-इन्टीमेशन लेटर द्वारे अवगत केले.

श्रीमती चांदणी सोनी यांनी डिक्लेरेशन देवून सुध्दा त्या प्रमाणे आमच्या कंपनीकडे स्वामित्व हक्क असलेल्या कंपनीचे संगीत वाजविले जाणार नाही याबाबतची खातरजमा करण्यासाठी आमच्या कंपनीचे सेल्स प्रतिनिधी श्री. अभिजित दांडीनोर हे 'डायमेंन्शन कम्युनिकेशन प्रा.लि.,' (व्हेलव्हेट वाईब्ज) या कंपनीचे प्रतिनिधी या नात्याने नमूद कार्यक्रमास उपस्थित राहीले. नमूद तीन दिंवसाच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी आमच्या कंपनीकडे स्वामित्व हक्क असलेल्या कंपनीचे संगीत वाजविले याबाबत पडताळणी करीत असताना दिनाक 22/08/2025 रोजी 14.00 वा. चे सुमारास बॉलरूम नं. 3, ग्रॅण्ड हयात हॉटेल, सांताक्रुज (पूर्व), मुंबई या ठिकाणी सारेगमा इंडीया लि. या संगीत

मुंबई पोलीस

कंपनीने आमच्या कंपनीला स्वामित्व हक्क दिलेल्या 'जिगरा' या चित्रपटामधील 'जिगरा' व 'फुलो का तारो को' ही दोन गाणी त्यांच्या म्युझिक सिस्टम मध्ये वाजविली. नमूदबाबत 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.' व त्यांची सिस्टर कंपनी क्रिएट अँड कोलॅब प्रा. लि. यांनी आमच्या स्वामित्व हक्काचा भंग केल्याचे श्री. अभिजित दांडीनोर यांच्या निदशनास येताच त्यांनी त्यांच्याकडील मोबाईल फोनव्दारे सदरच्या दोन्ही गाण्याचे व्हीडीओ रेकॉर्डींग केले. त्यानंतर श्री. अभिजित दांडीनोर यांनी सदरबाबत आमच्या कंपनीस प्रतिज्ञापत्राव्दारे नमूद स्वामित्व हक्काचा भंग केल्याबात सादर केले आहे.

नमूद प्रतिज्ञापत्राच्या अनुशंगाने आमच्या कंपनीचे लिगल टीम यांनी दिंनाक 25/08/2025 रोजी 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.' यांना वकीला मार्फत नोटीसव्दारे आमच्या कंपनीच्या स्वामित्व हक्काचा भंग केल्याबाबत माहिती देवून त्यांच्या विरूध्द पुढील कायदेशीर कारवाई का करू नये? याबाबतचा 7 दिवसात त्याचे उत्तर सादर करण्याबाबत कळविले होते. परंतु त्यांनी त्यांचे उत्तर सादर केले नाही तसेच यापुर्वी टीएम व्हेन्चर प्रा. लि कंपनीची सिस्टर उप कंपनी नामे क्रिऐट अॅन्ड कोलॅब प्रा.लि कंपनीने सन 2023 मध्ये दि 07/09/2023 ते दि 09/09/2023 आणि सन 2024 मध्ये दि 06/08/2024 ते दि 08/08/2024 या कालावधी मध्ये ग्रॅन्ड हयात हॉटेल मध्ये ऑल अबाऊट म्युजिक हा कार्यक्रम करण्यासाठी आमच्या कंपनीकडुन कंपनीला स्वामित्व हक्क प्राप्त झालेली गाणी वाजविण्यासाठी परवाना प्राप्त केला होता.

यावरून आमच्या कंपनीची खात्री झाली की, दिंनाक 22/08/2025 रोजी 14.00 वा. चे सुमारास बॉलरूम नं. 3, ग्रॅण्ड हयात हॉटेल, सांताक्रुज (पूर्व), मुंबई या ठिकाणी सारेगमा इंडीया लि. या संगीत कंपनीने आमच्या कंपनीला स्वामित्व हक्क दिलेल्या 'जिगरा' या चित्रपटामधील 'जिगरा' व 'फुलो का तारो का' हे दोन गाणी 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.' यांची उप कंपनी 'क्रिएट अँड कोलॅब प्रा. लि.' यांनी विनापरवाना त्यांच्या म्युझिक सिस्टम मध्ये वाजवून आमच्या कंपनीकडे असलेल्या स्वामित्व हक्काचा भंग केलेला आहे. 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.,'आणि त्या कंपनीचे चे डायरेक्टर श्री आलाप जयंतीलाल गोशेर (DIN 08959378), नॉमिनी डायरेक्टर श्री देवराज सन्याल ( DIN 03533598), डायरेक्टर श्री सौरभ अभि (DIN 09617471), अँडिशनल डायरेक्टर श्री सनुजीत भुजबळ ( DIN 01915460), 'क्रिएट अँड कोलॅब प्रा. लि.' चे बिझनेस हेड श्रीमती चांदणी सोनी यांच्या विरूध्द कारवाई होण्यास माझी तक्रार आहे.

वर नमूद माहितीस दुजोरा देण्यासाठी खालील नमूद कागदपत्रे माझे स्वाक्षरीने सादर करीत आहे.

01. कंपनीने मला दिलेले अधिकारपत्र.
02. सारेगमा इंडीया लि. यांनी आमच्या कंपनीला दिलेले अधिकारपत्र व करारपत्र.
03. आमच्या कंपनीकडे असलेल्या स्वामित्त हक्काबाबतची माहिती विविध वर्तमानपत्र व मॅगझीन याव्दारे प्रकाशित केलेली आहे.
04. श्री. अभिजित दांडीनोर याचे प्रतिज्ञापत्राची छायांकित प्रत, डीव्हीडी व पेनड्राईव्ह.
05. आमच्या कंपनीने 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.,' यांना ईमेलव्दारे केलेला पत्रव्यवहार.
06. आमच्या कंपनीने 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.,' यांना ईमलेव्दारे केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुशंगाने 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.,' यांनी दिलेले डीक्लेरेशन.
07. आमच्या कंपनीने 'टीएम व्हेन्चर प्रा. लि.' वर नमुद डायरेक्टर्स व 'क्रिएट अँड कोलॅब प्रा.लि.'च्या बिझनेस हेड श्रीमती चांदणी सोनी यांना दिंनाक 25/08/2025 रोजी पाठविलेली लिगल नोटीस.
08.क्रिऐट अॅन्ड कोलॅब प्रा.लि कंपनीने सन 2023 मध्ये दि 07/09/2023 ते दि 09/09/2023 आणि सन 2024 मध्ये दि 06/08/2024 ते दि 08/08/2024 या कालावधी मध्ये ग्रॅन्ड हयात हॉटेल मध्ये ऑल अबाऊट म्युजिक हा कार्यक्रम करण्यासाठी प्राप्त केलेल्या परवान्यांची छायांकित प्रत.

माझा जबाब मराठीतून संगणकाव्दारे टंकलिखित करण्यात आलेला असून त्याची प्रत काढून तो मला वाचावयास दिला. सदरचा जबाब मी वाचून पाहिला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकोला पोलीस ठाणे, मुंबई

(प्रविण खराडे)
पोलीस निरीक्षक,
वाकोला पोलीस ठाणे, मुंबई

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
PRAVIN VIJAY KHARADE
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा): 21/2/2026

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): PRAKASH NIVRUTTI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

ठाणे अंमलदार
वाकोला पोलीस ठाणे
मुंबई.